Annexure XII(4),(Vide Article-12.02.03)

राज्य शासकीय व जिल्हा परिषदा कार्यालयातील
वाहन चालकांना टेरिकॉट गणवेश पुरविणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग,

शासन निर्णय, क्रमांक :गणवेष -३४०५/९६४/प्र.क्र.६१/२००५/२९,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : २८ डिसेंबर, २००६

**वाचा** :-

१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: सीएलओ-१०८२/९१२९/२९, दिनांक २५ सप्टेंबर,१९९१.

२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: गणवेष-३४९३/प्र.क्र.४५/९५/२९, दिनांक ७ जून, १९९६

**प्रस्तावना :-**

शासकीय वाहन चालक संघटना, मुंबई यांनी राज्य शासनास अशी विनंती केली होती की, राज्य शासकीय वाहन चालकांना २ वर्षातून एकदा गणवेष खरेदी करण्यासाठी रु.१०००/- इतकी रोख रक्कम देण्याचा निर्णय १९९६ मध्ये घेण्यात आला होता. या बाबीस १० वर्षे झाली असून महागाई वाढीमुळे कपडा तसेच, अन्य साहित्याच्या दरात वाढ झाल्यामुळे वाहन चालकांना देण्यात येणा-या रक्कमेत वाढ करण्यात यावी. संघटनेची ही विनंती राज्य शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

शासकीय कार्यालयातील वाहन चालकांना दिनांक ७ जून,१९९६ च्या शासन निर्णयानुसार दर २ वर्षातून एकदा रु.१,०००/- (रुपये एक हजार फक्त) एवढी रक्कम टेरिकॉट गणवेष खरेदीसाठी मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या रक्कमेत आता वाढ करण्यात येत असून दिनांक **२/१/२००७** पासून प्रत्येक शासकीय वाहन चालकास दर २ वर्षातून एकदा रुपये २,५००/- (रुपये दोन हजार पांचशे फक्त ) एवढी रक्कम शासन निर्णय, दिनांक २५ सप्टेंबर,१९९१ मधील तरतूदीस अधीन राहून टेरिकॉट गणवेष खरेदीसाठी मंजूर करण्यात यावी. सदर रक्कम प्राप्त झाल्यानंतर रुपये २,५००/- एवढया रक्कमेचे गणवेष खरेदी करणे व त्या संबंधीची देयके शासनास सादर करणे वाहन चालकास बंधनकारक राहील. तसेच, शासकीय वाहन चालक संघटनेने मान्य केल्याप्रमाणे कार्यालयीन कामावर असताना गणवेष परिधान न केल्यास, संबंधित वाहन चालकावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

२. गणवेषात कोणकोणत्या बाबींचा समावेश असावा, त्याचा रंग या विषयी दिनांक २५ सप्टेंबर,१९९१ च्या तसेच, दिनांक ७ जून,१९९६ च्या शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या बाबीही कायम राहतील.

३. वाहन चालकाच्या गणवेषासाठी होणारा खर्च संबंधित विभागाने / कार्यालयाने त्यांच्या मंजूर अनुदानातून भागवावयाचा आहे.

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ (१९६१ चा अधिनियम क्रमांक ५) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार व त्या संबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असेही आदेश देत आहे की, सदर आदेश जिल्हा परिषदांतील वाहन चालकांच्या गणवेषासाठी लागू राहतील. मात्र त्या संबंधीचा खर्च संबंधित जिल्हा परिषदांनी त्यांच्या मंजूर अनुदानातून भागवावयाचा आहे.

५. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ६६५/०५/व्यय-४, दिनांक ६.१०.२००५ तसेच राज्य निवडणूक आयोग यांचे पत्र क्र.रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१९/का.०५, दिनांक २०.१२.२००६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६१२२८१५५१४१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( प्र. मा. माळवदकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :-

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मंत्री / राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव, /स्विय सहाय्यक
प्रबंधक , मुळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
प्रबंधक लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी/सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
मंत्रालयाच्या निरनिराळया विभागातील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
महालेखाकार, महाराष्ट्र-१, मुंबई/महालेखाकार, महाराष्ट्र-२, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी मुंबई/निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग, व्यय-४, विनियम शाखा, मंत्रालय.
उद्योग, उर्जा व कामगार विभाग( उद्योग-६),
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने /कक्ष,
निवड नस्ती, सामान्य प्रशासन विभाग/२९